सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२,
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in. वेबसाईट:http://www.dtemaharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/मान्यता-विकापु/पीसीआय/२३-२४/ ८३७ दिनांक: 21 SEP 2023

कार्यालयीन आदेश :

विषय : फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली व शासन मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर नवीन संस्था सुरू करणे, विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम व सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढीसाठी मान्यतेबाबत......

संदर्भ : १) शासन निर्णय क. मान्यता- २०२३/प्र.क्र.५७/तांशि ४, दि.१९.०६.२०२३
२) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ५७/तांशि-४, दि. ३१.०७.२०२३
३) शासन शुध्दिपत्रक क्र. मान्यता-२०२३/ प्र.क्र.५७/ तांशि-४, दि. ११.०८.२०२३
४) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ५७/ तांशि-४, दि. १७.०८.२०२३
५) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ५७/(भाग-१)/ तांशि-४, दि. १८.०८.२०२३
६) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ५७/ तांशि-४, दि. २३.०८.२०२३
७) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ५७/(तांशि-४, दि. ०१.०९.२०२३

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली या शिखर परिषदेच्या मान्यतेस अनुसरून शासनाने संदर्भीन शासन निर्णयान्वये सोबतच्या **"विवरणपत्र अ"** मध्ये नवीन संस्था व **"विवरणपत्र ब"** मध्ये विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर विहित अटींच्या अधिन राहून सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे कार्यक्षेत्रात येणा-या सोबतच्या विवरणपत्र "अ" व "ब" मधील संस्थांनी संदर्भीन शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेबाबतची कागदपत्रे या संचालनालयास उपलब्ध करुन दिली आहेत. संबंधित संस्थांनी शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्ती यांचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये निर्धारीत संयुक्त खात्यात १० वर्ष मुदतीची मुदतठेव व निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क इ. बाबतची कागदपत्रे सादर केली आहेत. तसेच संबंधित विद्यापीठ / महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता संलग्नता / तात्पुरती संलग्नता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन संदर्भीन शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सोबतच्या **"विवरणपत्र अ"** मध्ये दर्शविलेल्या नवीन संस्थेतील अभ्यासक्रमांना व **"विवरणपत्र ब"** मध्ये दर्शविलेल्या विद्यमान संस्थेतील नवीन अभ्यासक्रमास व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमता वाढीसह या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर अनिवार्य बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी संस्थेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करतील. तसेच संचालनालयाने निर्देशित केलेली माहिती संस्थांना संचालनालयामार्फत विकसीत केलेल्या प्रवेश क्षमता मान्यतेच्या पोर्टलवर अद्ययावत करणे अनिवार्य राहील.

३. संस्थेने प्रवेशासाठी संबंधित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे, तसेच संबंधित पदविका अभ्यासक्रमांची तंत्र शिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. शासनाने, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली व या संचालनालयाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन / फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली, यांना राहतील.

५. शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये ज्या बाबींसाठी दुस-या वर्षासाठी संयुक्त खात्यात मुदतठेव विहित केलेली आहे, अशा बाबींसाठी संबंधित संस्थांनी दुसरे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापुर्वी संस्थेचे अध्यक्ष / सचिव व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संयुक्त नांवे १० वर्षासाठीची मुदतठेवीची पावती पडताळणीसाठी संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयाकडे सादर करणे अनिवार्य राहील.

६. ज्या सस्थांच्या अभ्यासक्रमांना संबंधित विद्यापीठाने संलग्नता अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रदान केली असल्यास संलग्नतेच्या आदेशातील अटी व शर्तींची पुर्तता संबंधित संस्थांना करणे बंधनकारक राहील. तसेच संबंधित संस्थांना विद्यापीठ / मंडळाच्या नियमांप्रमाणे नियमित संलग्नता घेणे बंधनकारक राहील.

७. आग प्रतिबंधक प्रमाणपत्राचे सक्षम प्राधिका-याकडून वेळोवेळी नुतनीकरण करणे अनिवार्य राहील.

८. विद्यार्थी, विद्यार्थीनी, महिला, मागासवर्गीय व सर्वसाधारण अधिकारी / कर्मचारी यांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता शिखर परिषद / शासन / विद्यापीठ यांचे निर्देशानुसार स्वतंत्र समित्या गठित करणे अनिवार्य राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व या व्यतिरीक्त वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे विवरणपत्र "अ" व "ब" मधील संस्थांना बंधनकारक राहील.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, ९ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायर मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे / डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
३. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई
४. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
५. संबंधित संस्था
६. कार्यासन क्र. २ अ, ३ व १० मुख्य कार्यालय, मुंबई.
७. निवड नस्तीस.

E:\Vijay\Approval Process\2023\Final Order\PCI\New Folder\Pune.Docx

## Annexure A

Directorate of Technical Education, M.S. Mumbai - Office Order No. 2/NGC/MANYATA-ROPU/PCI/23-24/837, Dated 21/09/2023

List of New Institute , Approved by PCI and Government of Maharashtra for A.Y. 2023-24

| SR. NO. | DTE CODE | PCI CODE | INSTITUTE NAME AND ADDRESS | GOVERNMENT RESOLUTION NO. AND DATE | STATUS | PROGRAMME | LEVEL OF COURSE | COURSE NAME | UNIVERSITY NAME | APPROVED INTAKE A.Y. 2022-23 | INTAKE APPROVED BY PCI and GOVT. A.Y.2023-24 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 6470 | PCI-6470 | Suryadatta College of Pharmacy Healthcare and Research SCPHR, 342, Patil nagar, Bavdhan, Pune - 411 021 | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-19/06/2023 | Un-aided | PHARMACY | UNDER GRADUATE | B.Pharmacy | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 0 | 60 |
| | | | | | | | DIPLOMA | D.Pharmacy | Maharashtra State Board of Technical Education Mumbai | 0 | 60 |
| 2 | 16103 | PCI 8418 | Chetana College of Pharmacy, Sardewadi, Tal. Indapur, Dist.Pune - 413 106 | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-17/08/2023 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | B.Pharmacy | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 0 | 60 |
| 3 | 16104 | PCI-8603 | Bharati Vidyapeeth College of Pharmacy, Palus, Dist.Sangli - 416 310 | G.R.No.Manyata-2023/C.R.57(PART -1)/TE-4, Dated-18/08/2023 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | B.Pharmacy | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 0 | 60 |
| | | | | | | | DIPLOMA | D.Pharmacy | Maharashtra State Board of Technical Education Mumbai | 0 | 60 |
| 4 | 16107 | PCI-8540 | YSPMs Yashoda College of Pharmacy, Satara, Wadhe - 415 011 | G.R.No.Manyata-2023/C.R.57(PART -1)/TE-4, Dated-18/08/2023 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | B.Pharmacy | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 0 | 60 |
| 5 | 16109 | PCI-8992 | Dalit Mitra Kadam Guruji College of Pharmacy, Mangalwedha, Tal.Solapur, Dist.Kolhapur | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-17/08/2023 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | B.Pharmacy | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 0 | 60 |
| | | | | | | | DIPLOMA | D.Pharmacy | Maharashtra State Board of Technical Education Mumbai | 0 | 60 |
| 6 | 16111 | PCI-8387 | Rajmata Ahilyadevi Charitable Foundation's SVS College of Pharmaceutical Education and Research, Tembhurni, Tal. Madha, Dist.Solapur 413 211 | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-23/08/2023 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | B.Pharmacy | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 0 | 60 |
| | | | | | | | DIPLOMA | D.Pharmacy | Maharashtra State Board of Technical Education Mumbai | 0 | 60 |
| 7 | 16112 | PCI-8554 | Dr. Ahok Gujar Institute of Pharmacy, Vidyanagar Extn. Banawadi, Tal.- Karad, Dist. Satara, 415124 | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-23/08/2023 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | B.Pharmacy | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 0 | 60 |
| 8 | 16110 | PCI-8596 | Shahajirao Patil Vikas Pratishthan's S B PATIL College of Pharmacy, Vangali, Indapur 413 106 | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-23/08/2023 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | B.Pharmacy | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 0 | 60 |
| | | | | | | | DIPLOMA | D.Pharmacy | Maharashtra State Board of Technical Education Mumbai | 0 | 60 |
| 9 | 16117 | PCI- 9030 | Balasaheb Desai College of Pharmacy, At Pal, Tal. Bhudargad, Dist. Kolhapur | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-17/08/2023 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | B.Pharmacy | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 0 | 60 |

OFFICE OF THE DIRECTORATE OF TECH. EDN. M.S. MUMBAI

Joint Director
Directorate of Technical Education
Maharashtra State, Mumbai

# Annexure B

Directorate of Technical Education, M.S. Mumbai - Office Order No. 2/NGC/MANYATA-ROPU/PCI/23-24/837, Dated 21/09/2023

List of New Course and Increase in intake in existing Unaided Pharmacy institute, Approved by PCI and Government of Maharashtra for A.Y. 2023-24

| SR. NO. | DTE CODE | PCI CODE | INSTITUTE NAME | GOVERNMENT RESOLUTION NO. AND DATE | PROGRAMME | LEVEL OF COURSE | MAIN COURSE NAME | COURSE NAME | UNIVERSITY NAME | APPROVED INTAKE A.Y. 2022-23 | INTAKE APPROVED BY PCI AND GOVT. A.Y.2023-24 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 6360 | 879 | Shree Chanakya Education Society's Indira College of Pharmacy, Niramay, 89/2A, New Pune-Mumbai Highway, Tathawade, Pune- 411 033 | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-31st July, 2023 | PHARMACY | UNDER GRADUATE | B. Pharmacy | Pharmacy | Savitribai Phule Pune University, Pune | 60 | 100 |
| 2 | 6360 | 879 | Shree Chanakya Education Society's Indira College of Pharmacy, Niramay, 89/2A, New Pune-Mumbai Highway, Tathawade, Pune- 411 034 | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-31st July, 2023<br><br>Govt. Corrigendum .No. Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-11TH August, 2023 | PHARMACY | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmacology | Savitribai Phule Pune University, Pune | 0 | 9 |
| 3 | 6364 | 1564 | Progressive Education Society's Modern College of Pharmacy( for Women), Boradewadi, Dehu Alandi Road, At Post - Mashi Tal - Haveli, Dist- Pune | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-31st July, 2023 | PHARMACY | POST GRADUATE | Pharm D | Pharm D | Savitribai Phule Pune University, Pune | 0 | 30 |
| 4 | 6927 | 3517 | SSP Shikshan Sanstha's Siddhi College of Pharmacy, 1157-1160, Navale Vasti, Chikhali, Akurdi Road, Pune - 412 114 | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-31st July, 2023 | PHARMACY | UNDER GRADUATE | B. Pharmacy | Pharmacy | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 60 | 100 |
| 5 | 6936 | 3618 | Krishna Foundations Jayawant Institute of Pharmacy Vathar, Gat No. 40,41, Pune Banglore Highway, Tal. Karad, Dist, Satara 415539 | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-31st July, 2023 | PHARMACY | UNDER GRADUATE | B. Pharmacy | Pharmacy | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 60 | 100 |
| 6 | 6982 | PCI-5320 | New College of Pharmacy Kolhapur, R.S. No. 264, Shantinagar Unchgaon East Kolhapur | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-01st September, 2023. | PHARMACY | UNDER GRADUATE | B. Pharmacy | Pharmacy | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 0 | 60 |

OFFICE OF THE DIRECTORATE OF TECH. EDN. M.S. MUMBAI

Joint Director
Directorate of Technical Education
Maharashtra State, Mumbai

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १०/एनजीपी/नवीन संस्था/मान्यता/२०१९/ ६६०२
दिनांक : 01 JUL 2019

प्रति,
प्राचार्य,
कृष्णा फौंडेशनचे,
जयवंत इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी,
वाठार, ता. कराड,
जि. सातारा-४१५५३९.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर औषधनिमार्णशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्याबाबत.

संदर्भ :१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र. वेस्टर्न/२०१९-२०/1-४६४२८३५३४१ दि. ३० एप्रिल, २०१९.
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. मान्यता-२०१९/(प्र.क्र.९६/१९)तांशि-५, दि. २० जून, २०१९.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून कायम विना-अनुदान तत्वावर औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | डी.फार्मसी | ६० |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र "अ" व "ब" या संचालनालयास सादर केलेले आहे. आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून कायम विना अनुदान तत्वावर औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास नियतठेव म्हणून रु. ७.५० लाख खाते क्र. ६०३३३३०४९९१, दि.२४.६.२०१९ अन्वयें बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा- कराड, येथे संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत. तसेच द्वितीय वर्षासाठी रु.७.५० लाख १० वर्षे मुदतीसाठी संयुक्त खात्यात जमा करुन सदर मुदत ठेवींची मूळ पावती पडताळणीसाठी या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्तीसह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून कायम विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

Scanned by CamScanner

२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेतांक क्रमाक व पासवर्डद्वारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था व संचालनालयाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी अद्ययावत करतील.

३ प्रस्तूत मान्यता ही संबंधित अभ्यासक्रमांस महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे संलग्नतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे. सबब आपल्या संस्थेतील अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता प्राप्त करणे अनिवार्य असून, मंडळाच्या संलग्नतेशिवाय संस्थेमध्ये कोणतेही प्रवेश करण्यात येऊ नयेत.

४. संस्थेने प्रवेशासाठी औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांची [D. Pharmacy] तंत्रशिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

५. शासनाने, या संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांना राहतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
३. कार्यासन क्र.३, (आय.टी.सेल) मुख्य कार्यालय, मुंबई
४. निवड नस्ती.

Scanned by CamScanner